# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे/तातडीचे

क्रमाक:२अ/एडीएम/जातवैप्रवेश/२०१७/ २२५

दिनांक : 6 MAR 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

**विषय:- व्यावसायिक अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे हमी पत्र सादर करुन तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पुढे सुरु ठेवण्याबाबत कार्यवाही.**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/प्रवेश/२०१६/१२७५, दि. २२.०९.२०१६

२) शासन परिपत्रक आदिवासी विकास विभाग क्र. एसटीसी-२०१६ /प्र.क्र.१८० /का. १०, दि. २५.०७.२०१६

३) शासन निर्णय सा. प्र.वि. क्रमांक बीसीसी२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/ २०१३/ १६-ब, दि. २१.०२.२०१५

या संचालनालयामार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया पार पाडल्यां जात असतात. सदर प्रवेश प्रक्रियेच्या वेळी विद्यार्थ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राच्या आधारे जात वैधता प्रमाणपत्र ३ महिन्याच्या मुदतीत सादर करण्याच्या हमीपत्रावर तात्पुरत्या स्वरुपात (Provisional) प्रवेश दिले जातात. मात्र संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, सदर विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण झाला तरी सुध्दा जात वैधता प्रमाणपत्र संस्थे मध्ये सादर करीत नाहीत. अशा विद्यार्थ्याचे जात वैधता प्रमाणपत्र ३-४ वर्षानंतर प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेच्या गुणवत्ता यादीतील त्रुटी रद्द करण्यासाठी विलंबाची कारणे नमूद न करता प्रस्ताव संस्थेकडून/विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयाकडे सादर केला जातो. यासंदर्भात त्रुटी रद्द करण्याची आवश्यता एवढया उशिरा का भासली? विद्यापीठाने निकाल रोखून धरला आहे किंवा कसे? किंवा प्रवेश नियामक प्राधिकरणाने (पूर्वाश्रमीचे प्रवेश नियंत्रण समिती) यांचेकडून नव्याने कांही सूचना संस्थेला देण्यात आल्या किंवा कसे हे प्रस्तावात स्पष्ट नमूद केले जात नाहीत. तेव्हा विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पुर्ण करुन बाहेर पडल्यानंतर काही कारणास्तव त्रुटी दूर करण्यास मान्यता देणे आवश्यक वाटल्यास असा प्रस्ताव स्पष्ट कारणे नमूद करुन संचालनालयास सादर करावा. ही बाब आपल्या अधीनस्त सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

सर्व संस्थांच्या निदर्शनास प्रसिद्ध करावे.

1770

10 MAR 2017

Desai-D:\OLD PC DATA\Admission 2017- 18\R O.doc

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ६३/२०१४ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४.१२.२०१४ रोजी दिलेले आदेश व या संदर्भात शासनाने दि. १९.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये ज्या अनुसूचित जमातीच्या (ST) उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून दाव्याची वैधता निश्चित झालेली नाही किंवा समितीकडे दावा प्रलंबित आहे केवळ अशा प्रकरणीच उमेदवारांनाच जात वैधता प्रमाण पत्राअभावी प्रवेशापासून व इतर लाभापासून वंचित ठेवण्यात येऊ नये, असे आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. मात्र त्या व्यतिरिक्त अन्य प्रकरणी जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केले नसल्यास ती मुदत संपताच असे प्रवेश रद्दबातल करण्याचे आदेश प्राचार्यानी वेळीच त्यांचे स्तरावरुन निर्गमित करणे आवश्यक ठरते. मात्र याला केवळ ESBC प्रवर्गात झालेले १४ नोव्हेंबर २०१४ रोजी पूर्वीचे प्रवेश अपवाद ठरतील.

तेव्हा ज्या उमेदवारानी प्रवेशावेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नसल्यामुळे हमी पत्र (Proforma H ) सादर करुन प्रवेश घेतलेले आहेत. परंतु विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांच्या प्रवेशाबाबत माहिती पुस्तिकेच्या नियमावलीत नमूद केल्यानूसार कारवाई करण्यात यावी त्यासाठी प्रकरण परत्वे सूचना असे आपल्या विभागातील सर्व संस्थाना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे .

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई